# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची मूलभूत धोरणे

डॉ सुरेश किशन भदरगे
इतिहास विभाग प्रमुख,
बी. एन. एन.महाविद्यालय, भिवंडी

**प्रस्तावना**: अतिशय प्रतिकूल परिस्थिती असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती हि एक अलौकिक घटना होती. परंतु त्याच बरोबर निर्माण केलेल्या स्वराज्यात जनतेच्या हिताची प्रशासन व्यवस्था निर्माण करणे, हे त्याही पेक्षा अलौकिक असे कार्य होते. शिवाजी महाराजांनी हे राज्य रयतेचे राज्य मानून या राज्यातील सर्व समाजातील लोकांच्या हिताची कशी काळजी घेतली याचा शोध या शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपली राजेशाही प्रशासन व्यवस्था मजबूत केली होती. परंतु या राजेशाहीत लोकांना अनुकूल असलेली व्यवस्था कशा प्रकारे निर्माण केली, या विषयीचा अभ्यास या शोधनिंबधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. हि लोकाभिमुख व्यवस्था निर्माण करत असताना कोणत्या धोरणांचा त्यांनी अवलंब केलेला होता या बाबत संशोधन करण्याचा प्रयत्न या शोधनिंबधात केला गेलेला आहे.

**मुख्य शब्द: कृषी धोरण, युद्धनीती, लष्करी व्यवस्था, हेरखाते, स्त्रियांचा सन्मान वनसंवर्धन, पर्यावरण**

**छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी धोरण** : छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आपणास प्रेरणा देणारा आहे. त्यांनी अत्यंत खडतर परिस्थिती असताना आपले स्वराज्य निर्माण केले. त्यांचे समकालीन इंग्रज, मोगल, आदिलशाही व निजामशाही यां सारख्या बलाढ्या राजकीय शत्रूशी कणखर मुकाबला करून आपले स्वराज्य निर्माण केले. या स्वराज्यात त्यांनी आपल्या प्रजेची काळजी घेतली. त्याही काळात सिंचनाचे प्रमाण कमी होते. तरी सुद्धा दुष्काळामुळे त्या काळात कोणत्याही शेतकऱ्याने आत्महत्या केली नव्हती. कारण शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांच्या सर्व समस्या आपल्या समस्या आहेत हे समजुन शेतकऱ्यांना अशा अडचणीच्या काळात आर्थिक मदत दिली होती. शेतकऱ्यांचे मनोधैर्य वाढवले. रयतेच्या सुरक्षेला प्राधन्य दिले. सरकारातील सर्जेराव जेधे यांना 23 ऑक्टोबर 1962 ला दिलेल्या पत्रात ते म्हणतात की तुमच्या इलाख्यात मोगलांची फौज (शाहिस्तेखान) येत आहे असे हेरा कडून कळाले आहे. तेव्हा सर्व मुलं बाळासोबत सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. कोणत्याही प्रकारची या कामात हयगय करू नये. तसे केल्यास रयतेचे पाप तुझ्या माथी लागेल. अशा प्रकारे रयतेच्या हिताची काळजी घेणारे राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होय.

शिवरायांनी १९ मे १६७३ रोजी चिपळूण हलकर्णी येथील जुमलेदारास पाठवलेल्या पत्रात शेतकऱ्यांशी कसे वागावे याबद्दल मार्गदर्शन करताना ते म्हणतात की," जनावरांचा चारा काटकसरीने वापरा, चाऱ्याची उधळपट्टी कराल, तर पावसाळ्यात शेतकऱ्यांना चारा मिळणार नाही. चाऱ्या अभावी जनावरे मरतील. तसे होऊ देऊ नका. तुमच्या सैन्याला जर मोहिमे दरम्यान धान्य, भाजीपाला, लाकूड हवे असल्यास ते बाजारातून विकत घ्या. परंतु कोणत्याही शेतकऱ्याला त्रास होईल असे वर्तन करू नका. ५ सप्टेंबर १६७६ ला आपल्या सुभेदाराला लिहिलेल्या पत्रात शिवाजी महाराज आज्ञा देतात की, शेतकऱ्यांना लुटू नये. शेतकऱ्यांच्या शेतात चोरी करू नये. उलट शेतकऱ्यांची सेवा करावी. शेतकऱ्यांना त्यांच्या संकटसमयी मदत करावी असे आदेश त्यांनी आपल्या आधिकाऱ्यांना दिले होते. शेतकऱ्यांच्या शेत मालाला रास्त भाव मिळाला पाहिजे, याची काळजी शिवाजी महाराजांनी घेतलेली होती. शेतकऱ्यांचे धान्य गोदामात पडून राहता कामा नये. त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळवून दिला पाहिजे. त्यांचे धान्य योग्य वेळी विकले गेले जाईल याची काळजी छत्रपती शिवाजी महाराज घेत होते. शेतकऱ्यांच्या आर्थिक टंचाईच्या काळात शिवाजी महाराज आपल्या सुभेदाराला सांगतात की, गावोगावी फिरा, शेतकऱ्यांची अडचण समजून घ्या. त्यांना बैल, नांगर इत्यादी साधनांची मदत करा. त्यांना पैसे अथवा धान्य हवे असल्यास ते द्या. दिलेली

मदत जोर जबरदस्तीने वसूल करू नका. आपल्या तिजोरीवर बोजा पडला तरी चालेल परंतु शेतकऱ्यांचे हित जपले पाहिजे. असे शिवाजी महाराज आपल्या सरकारातील सुभेदाराला वेळोवेळी आज्ञा देत असत.[1]

**छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण:** छत्रपती शिवाजी महाराज यांचे धार्मिक धोरण अतिशय स्पष्ट होते. स्वराज्याच्या झेंड्याखाली उभा राहील तो स्वधर्मीय व मोगलांच्या झेंड्याखाली उभा राहील तो परधर्मीय अशी छत्रपती शिवरायांची धर्माविषयीची सोपी व्याख्या होती. बाजी घोरपडे, सुर्वे, चंद्रराव मोरे, सावंत लखम हे सर्व शरीराने स्वधर्मीय होते पण मनाने परधर्मीय होते. मोगलानी जेवढे वैर धरले नसेल तेवढे या स्वकीय म्हणाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजा सोबत धरले होते. या स्वकीय म्हणवणाऱ्यांचा धर्म कोणता होता? मोगल बादशाहीची चाकरी करून धनदौलत पदरात पाडून घेणे. म्हणजेच स्वार्थ हाच त्यांचा धर्म होता. छत्रपती शिवाजी महाराज व त्याच्या स्वराज्याशी बेईमानी करणार्यांना स्वधर्मीय कसे म्हणता येईल. तो मोगल बादशहा आपल्याच मुली बाईंना डोळ्यादेखत पळून नेतांना ह्यांना काहीच शरम वाटत नसे. स्वार्थ हाच त्यांचा धर्म होता. या उलट मदारी मेहतर, सिद्दी इब्राहिम, दौलत खान हे शरीराने मुसलमान असून देखील महाराजांच्या सोबत ठामपणे स्वराज्याच्या झेंड्याखाली एकजूट होऊन लढले व मोगल सत्तेला सळो कि पळो करून सोडले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्र्याच्या सुटकेमध्ये मदारी मेहतर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. महाराजांनी स्वराज्यात परत आल्यावर मदारी मेहतर याला विचारले कि, सांग तुला काय हवे आहे? तेव्हा स्वामीनिष्ठ मदारी मेहतर याने त्यांच्याकडे महाराजांच्या सिंहासनाची देखभाल करण्याचे काम मागितले. मदारी सारख्या मुसलमानांनी आपला स्वराज्य धर्म पाळला. म्हणूनच छत्रपती शिवरायांनी स्वराज्याच्या हितासाठी लढणाऱ्या सर्वांनाच स्वधर्मीय मानले व त्यांचा सन्मान राखला.[2] छत्रपती शिवाजी महाराज सर्व धर्माचा सन्मान करायचे. त्यांच्या लष्कर आणि प्रशासकीय नियुक्त्यांमध्ये या धोरणांची झलक दिसते. छत्रपती शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराव भोसले यांनी सुफी संत शहाशरीफ यांच्या सन्माना प्रित्यर्थ आपल्या मुलांची नावे शहाजी व शरीफजी अशी ठेवली होती. शिवाजी महाराज औरंगजेबाविरुद्ध आणि स्थानिक हिंदू राजा विरुद्ध देखील लढले. औरंगजेबाविरुद्धच्या युद्धात औरंगजेबाच्या सैन्याचे नेतृत्व करनारा राजा जयसिंग हिंदू रजपूत होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासनात मानवतेचे धोरण स्वीकारलेले होते. त्यांचे प्रशासन कोणत्याही धर्मावर आधारित नव्हते. त्यांच्या लष्कर आणि नौसेनेत, सैनिकांच्या नियुक्तीसाठी धर्म हा निकष महत्त्वाचा नव्हता. शिवाजी महाराजांच्या आरामारचा प्रमुख दौलतखान होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक अंगरक्षका पैकी एक सिद्दी इब्राहीम हा अंगरक्षक मुस्लिम होता.[3] त्यांच्या आरामारात सिद्धी मुस्लिम हे मोठ्या संख्येने होते. तेव्हा शिवाजी महाराज आग्र्यात नजरकैदेत होते, तेव्हा तिथून पलायन करण्यासाठी ज्या दोघांनी त्यांना मदत केली होती, त्यांच्यात मदारी मेहतर हे मुस्लिम होते. त्यांच्या गुप्तहेर विभागाचे सचिव मौलाना हैदर अली होते. त्यांच्या शस्त्रागाराची कमान इब्राहीम खानच्या हाती होती. शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्याला स्पष्ट आदेश दिला होता की कोणत्याही परिस्थितीत मुस्लिम महिला आणि लहान मुलांबरोबर गैरवर्तन व्हायला नको. त्यांनी मशीद आणि दर्ग्याला पुरेशी सुरक्षा दिली होती. जर कुणाला कुराणाची प्रत मिळाली तर ती प्रत पूर्ण सन्मान पूर्वक मुस्लिमांना परत करायवी असा त्यांचा आदेश होता. भारतीय इतिहासाच्या प्रारंभापासून भारतात "यथा राजा तथा प्रजा" हा अलिखित नियम कटाक्षाने पाळला जात होता. राजाचा जो धर्म असेल तोच प्रजेचा धर्म मानला जात होता. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात कोणावरही धार्मिक जबरदस्ती लादली नव्हती.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचे धोरण:** युद्ध हे केवळ शस्त्राच्या बळावर नव्हे तर बुद्धीच्या बळावर जिंकले जाते हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीमधील एक महत्त्वाचा व मूलभूत पाय होता. छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी राज्याचे विकेंद्रीकरण केले होते. त्यांनी आपले स्वराज्य डोंगरी किल्ले, जलदुर्ग व भिईकोट किल्ले यामध्ये विभागून स्वराज्याला नैसर्गिक संरक्षण दिले होते. शिवाजी महाराजांचे एक एक किल्ले व दुर्ग म्हणजे स्वराज्याच्या स्वरक्षणाचे महत्वपूर्ण ठिकाण होते. राजांनी समुद्रावर वर्चस्व राहावे म्हणून स्वराज्याचे आरमार स्थापन केले. स्वराज्यातील कोकण किनारपट्टीच्या ठिकाणांचे शत्रूपांसून संरक्षण केले. या संरक्षणासाठी त्यांनी मालवण, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी, उंदेरी या सारखे अनेक सागरी किल्ले बांधले होते. या सर्व किल्ल्यांच्या आसपास शत्रू फिरकू शकणार नाही अशी योग्य जागा या सर्व किल्ल्यांसाठी शिवाजी महाराजांनी निवडली

होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या आरमारामध्ये लहान आकाराच्या जहाजावर जास्त भर दिलेला होता. हि जहाजे शत्रूवर अचानकपणे हल्ला करून शत्रू सावध होण्यापूर्वीच मागे परत फिरण्यास सक्षम होती. शत्रूंना या आरमारी जहाजांचा पाठलाग करणे कठीण होत असे. त्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज आपल्या आरमाराचे आणि स्वराज्याचे संरक्षण करू शकले. शत्रूंचे शस्त्र प्राबल्य व सैन्यबळ ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमीकावा या युद्धतंत्राचा अवलंब केला होता. स्वराज्यातील सैन्यामध्ये स्थानिक लोकांना जास्त प्रमाणात संधी दिली होती. सैन्याला रोख पगार दिला जात असे. कुटुंबातील युवकांना सैन्यात नोकरी मिळाल्या नंतर त्यांच्या माता भगिनींना वस्त्रे, उपहार देऊन त्यांचा सन्मान करण्यात येई. युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या कुटुंबाची शिवाजी महाराज अत्यंत काळजी घेत असत.[4]

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करी व्यवस्थेचे धोरण:** इतिहासकार जदुनाथ सरकार म्हणतात की, 'कृषक वर्ग (कुणबी) म्हणजेच शेतकरी शिवाजीच्या लष्कराचा पाठीचा कणा होता. लष्करात मराठे, कुणबी ब्राह्मण, प्रभू, महार, मुसलमान, कोळी, भंडारी, रामोशी वगैरे 56 जातींचे लोक त्यांच्या लष्करात होते. शिवाजी महाराजांचे सैन्य हे राष्ट्रीय सैन्य होते. केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील सर्व जातीतील गुणवंतांना शिवाजीच्या सैन्यात प्रवेश दिला जात होता. सैनिकांना नियमित वेतन आणि कामगिरीनुसार बक्षीस मिळत असे. सैन्यात कडक शिस्त असे. हे सैन्य आठ महिने विविध मोहिमेवर पाठवले जात असे. जून ते सप्टेंबर या चार महिन्यात सैन्यातून त्यांना विश्रांती दिली जात होती. या चार महिन्यात या सैन्यातील बरेच लोक शेती करत असत. लष्करात बायको, बटकीन व कलावंतीस आणू नये, असा नियम होता. जो हे नियम पाळणार नाही त्याची गर्दन उडवली जावी अशी सक्त ताकीद शिवाजी महाराजांनी लष्कर प्रमुखाला दिली होती. शत्रूकडील स्त्रियांना पकडू नये, त्यांना छळू नये असा लष्करात नियम होता. गरीब, साधू, फकीर यांना लुटू नये. शत्रूच्या मुलखातील तांबे, पितळ या दैनंदिन वापरातील वस्तूला हात लावू नये. हिरे-मोती, सोने, चांदी अशी सर्व मौल्यवान लूट सरकारात जमा करावी. हे नियम मोडणाऱ्याला कडक दंड दिला जात असे. शिवाजी महाराज आपल्या सैनिकांना कुटुंबातील व्यक्ती प्रमाणे वागणूक देत असत.

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या हेरखात्याचे धोरण**: छत्रपती शिवाजी महाराजांचे हेरखाते अत्यंत कार्यक्षम होते. छत्रपती शिवाजी महाराजांना हेरांनी आणलेल्या अचूक माहिती मुळे अनेक लढायांमध्ये यश मिळाले होते. त्यांच्या हेर विभागाचे प्रमुख बहिर्जी नाईक होते. शिवाजी स्वतः सुधा उत्कृष्ट हेर होते. निरनिराळे सोंगे घेऊन शत्रूला भुरळ पडण्यात ते पटाईत होते. बैरागी, भिकारी, फकीर, गोसावी, भिल्ल, अपंग वगैरेंचे वेष धारण करून शिवाजी महाराजांचे लोक हेरगिरी करीत असत.[5] गुप्तहेर विभाग हा शिवाजी महाराजांच्या प्रशासनाचा कणा होता. शिवाजी महाराजांचे हेर हे सैन्यदल, नौदल, नागरी विभाग आणि छावण्यांमध्ये होते. त्यांनी संपूर्ण स्वराज्यात आणि इतर प्रदेशांमध्ये गुप्तहेरांचे जाळे विखुरलेले होते. हे हेर शत्रुपक्षाची सर्व माहिती शिवाजी महाराजांना वेळीच कळवत असत. कोणत्या राज्यात किती खजिना आहे व तो कुठे कुठे दडवला आहे, हेही त्यांना या हेरखात्या मार्फत कळू शकत होते. त्यामुळे शिवाजी महाराज आपल्या जलद हालचाली करू शकत होते व दोन-तीन दिवसांत आखलेली मोहीम यशस्वी करू शकत असत. त्याच बरोबर शत्रूपक्ष सावध होण्याच्या आतच शिवाजीमहाराज आपल्या इच्छित स्थळी पोहोचू शकत असत.[6]

छत्रपती शिवाजी महाराज शत्रूच्या गोटात आपले हेर पाठवून शत्रूची इत्यंभूत माहिती मिळाल्यानंतर शत्रू बेसावध असताना त्यांच्या सैन्यावर अचानक हल्ला करून त्यास पराभूत करत असत. या हेरां मार्फत इत्यंभूत माहिती स्वराज्याला मिळाल्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज आपल्या स्वराज्याचे रक्षण करू शकले. कोणताही जातीभेद न पाळता सर्व जातीतील व धर्मातील लोकांना छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यामध्ये समान संधी दिलेली होती. त्याचबरोबर या सैन्यामध्ये योग्य व्यक्तीची निवड करून त्यांच्याकडे योग्य कामगिरी छत्रपती शिवाजी महाराज सोपवत असत.

6 जानेवारी 1664 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत शहराची लूट केलेली होती. या कामी एक हेर म्हणून बहिर्जी नाईक यांनी प्रमुख भूमिका बजावली होती. बहिर्जी नाईक यांनी अनेक प्रकारचे वेष धारण करून या सुरत शहराची व शहरातील सावकारांची माहिती मिळवली होती. तेथील सावकारांकडे अमाप संपत्ती असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. ही सर्व माहिती त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना

कळवली होती. त्यामुळे निवडक मावळ्यांच्या मदतीने शिवाजी महाराजांनी सुरतेची मोहीम यशस्वी केली होती. या मोहिमेत देखील शिवाजी महाराजांच्या हेरखात्याने प्रमुख भूमिका बजावलेली होती.[7] अतिशय कमी वयात शिवाजी महाराजांनी त्यांच्या गुप्तचर यंत्रणेचे जाळे विणले होते. परकीय मुलुखात घडणाऱ्या घडामोडी, शत्रूचे डावपेच, हालचाली, आक्रमणाचे धोके, विस्तारासाठी अनुकूल परिस्थिती इ. अनेक बातम्या राजांच्या गुप्तचरांनी आणल्यामुळे शिवाजी महाराजांना अनेक लढायात यश संपादन करता आले.

**छत्रपती शिवाजी महाराज यांचे वनसंवर्धन व पर्यावरण धोरण:** छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या साम्राज्यातील निसर्गाचे रक्षण केलेले आढळते. छत्रपती शिवाजी महाराजांना आरमारासाठी लाकडांची आवश्यकता असे. आपल्या अधिकाऱ्यांना त्यांनी आपल्या आज्ञा पत्रामध्ये हे स्पष्टपणे सांगितले होते की आपल्या साम्राज्यात सागवान वृक्ष आहेत व आरमारासाठी हि वृक्ष अनुकूल असली तरी त्या वृक्षांच्या मालकाच्या परवानगीनेच ह्या वृक्षांचे लाकूड वापरले जावे. त्याचबरोबर स्वराज्य मध्ये असलेली आंबे, फणस इत्यादी वृक्ष आरमारासाठी उपयोगी असली तरी त्यांना कोणत्याही प्रकारची इजा करू नये. ही झाडे तोडू नयेत. अशी झाडे प्रजेने आपल्या लेकरांसारखी वाढवलेली असतात. त्यामुळे अशी झाडी तोडल्यास प्रजेला दुःख होते. त्यामुळे अशी झाडे तोडू नयेत. वृक्षाच्या अभावामुळे आपल्या निसर्गाची देखील हानी होते. त्यामुळे अशी झाडे अतिशय जीर्ण झाली असतील तरच, त्या झाडाच्या मालकाच्या परवानगीने ती झाडे तोडावीत व त्या बदल्यात त्या मालकास द्रव्य द्यावे. जबरदस्तीने प्रजेची झाडे तोडू नयेत. अशा प्रकारची आज्ञा छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना आज्ञापत्रात दिलेली आढळते.[8] शिवरायांनी आपल्या राज्यात वन संवर्धनासाठी अनेक कायदे केलेले होते. वन क्षेत्र वाढविणे, घराच्या अंगणात झाडे लावणे, काही करण्यासाठी झाडे तोडावी लागल्यास तोडलेल्या झाडांच्या बदल्यात नवीन तितकीच किंवा अधिक झाडे लावली पाहिजेत असा कायदा केलेला होता. त्याच बरोबर कोणतेही फळझाडे न तोडणे, स्वयंपाकसाठी व इतर वापरासाठी जळाऊ लाकूडच वापरले जावे असा कायदा छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला होता. तसेच शेतकऱ्यांनी वन शेती करून झाडे लावल्यास त्यास पीक म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी मान्यता दिली होती. छत्रपती शिवाजी महाराज शेतकऱ्यांना झाडे लावण्यासाठी अनुदान देखील देत होते. छत्रपती शिवाजी महाराज यांची आपल्या सेनापती व इतर सैनिकांना सक्त ताकीद होती कि सैन्याचा मुक्कामाच्या ठिकाणीच्या वनातील गवताची काडीही वापरु नये.[9]

**छत्रपती शिवाजी महाराजांची स्त्री विषयक धोरण:** स्त्रियांना सन्मानाची व न्यायाची वागणूक मिळावी हा छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रयत्न असे. स्त्रियांवरच्या अत्याचाराबाबत अत्यंत कठोर शिक्षा देण्यात येत असे. रांझ्याचे पाटील बाबाजी भिकाजी याने एका गरीब स्त्री सोबत बलात्कार केला तेव्हा या गंभीर गुन्ह्याची दखल महाराजानी स्वतः घेतली. त्याची पाटीलकी काढून घेतली. तसेच त्याचे त्याचे हात-पाय तोडले. त्याला देहदंडाची शिक्षा सुनावली. गुन्हेगाराचे पद, जात व धर्म महत्वाचा न मानता त्याने केलेले दुष्कृत्य महत्त्वाचे मानले. एखाद्या स्त्रीवर बलात्कार केला असेल तर त्याला देहदंड यासारखी जबर शिक्षा दिली होती. त्याच बरोबर ज्या स्त्रीवर अत्याचार झाला तिला शुद्ध करून घेण्याचे आदेश देऊन समाजात तिचे सामाजिक स्थान व मानसन्मान छत्रपती शिवाजी महाराजांनी राखला. महाराजांनी उच्च नैतिकता व समतावादी दृष्टिकोन आपल्या स्वराज्यात कायम रुजवला.[10]

**मुल्यांकन**: छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनाची, आरमाराची, लष्कराची जी मलभूत धोरणे होती ती प्रजेच्या हिताची होती. प्रजेच्या हिताच्या आड येणाऱ्या कोणत्याही व्यवस्थेला छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात थारा दिलेला नव्हता. त्यांनी आपले गुप्तहेर खाते अतिशय प्रबळ बनवले होते. त्यामुळे अनेक मोहिमेमध्ये त्यांना यश प्राप्त झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यत स्त्रियांचा मान सन्मान राखला जाईल याची काळजी घेतली होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे शेतीविषयक धोरण शेतकऱ्यांच्या हिताचे होते. शेतीसाठी आवश्यक मदत दिली जात होती. शेतसारा जबरदस्तीने वसूल केला जात नसे. शेतकरी स्वतःहून आपला शेतसारा सरकारी तिजोरीत जमा करतील अशी व्यवस्था शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्या मध्ये पर्यावरण संरक्षणाला देखील अतिशय महत्त्व दिले होते. त्यांनी आपल्या स्वराज्यात वृक्षांचे संवर्धन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांची लष्करी व्यवस्था शत्रूचा निःपात करू शकेल इतकी सक्षम होती. शिवाजी महाराजांच्या लष्करात अनेक जाती धर्माचे सैनिक होते. आपल्या स्वराज्याच्या कार्यात धर्म व जात कधीच अडसर ठरणार नाही असे धोरण छत्रपती शिवाजी महाराजांनी अवलंबले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्याने आपली संपूर्ण निष्ठा स्वराज्यासाठी अर्पण केलेली होती. छत्रपती शिवाजी महाराज आपल्या सैनिकांची सर्वांगीण काळजी घेत असत. त्यांची आर्थिक स्थिती सुदृढ राहवी यासाठी त्यांना रोख वेतन देत असत. त्याच बरोबर लष्करात शिस्त देखील राहील व कोणत्याही परिस्थितीत सैन्यात अराजकता माजणार नाही याची काळजी घेत असत. शत्रू पक्षातील स्रिया व मुले यांना कोणताही त्रास दिला जाऊ नये अशी सक्त ताकीद छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सैनिकांना दिलेली होती. सर्व धर्मियांच्या साधू ,फकीर, संत यांचा मानसन्मान राखला जावा असा आदेश त्यांनी आपल्या सैनिकांना दिलेला होता.

संदर्भ


1. मुख्य संपादक: श्रीराम पवार, : लेखक: श्रीमंत कोकाटे, ***शेतकऱ्यांचे हित जोपासणारे शिवराय***, सकाळ 19 फेब्रुवारी 2018, पुणे आवृत्ती
2. मेहेंदळे गजानन व शिंत्रे संतोष, ***शिवछत्रपतींचे आरमार***, गजानन परम मित्र पब्लिकेशन, पुणे पृ.क. १२६
3. कॉ. पानसरे गोविंद, ***शिवाजी कोण होता?*** लोक वाड:मय प्रकाशन, मुंबई पृष्ठ क्रमांक ३९
4. सातपुते मनोहर सातपुते बाबुराव, ***शिवराय आणि शिवकालीन संदर्भ***, ज्ञानेश्वरी प्रकाशन, पृ.क्र.113 ते 115,डोंबिवली
5. देशमुख मा.म., ***युगप्रवर्तक शिवराज आणि मराठ्यांची शौर्यगाथा***, विश्वभारती प्रकाशन, नागपूर, पृ. क्र. 48
6. बाळकृष्ण, ***शिवाजी द ग्रेट***, आर्या बुक डेपो, कोल्हापूर पृ. क्र. 91
7. केळूसकर कृ. अ., ***छत्रपती शिवाजी महाराज***, वरदा प्रकाशन चौथी आवृत्ती, पुणे, पृ. क्र. 254, 255
8. ***छत्रपती शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र***, , महाराष्ट्र वन विभाग
9. खेडेकर पुरुषोत्तम, ***लोकराजे शिवराय***, जिजाई प्रकाशन, पुणे, वर्ष 2010 , पृ. क्र. 36 37
10. शिखरे चंद्रशेखर, ***प्रति इतिहास (इतिहासाचे सत्य स्वरूप)***, जिजाई प्रकाशन, पुणे, पंचमावृत्ती, 28 सप्टेंबर 2011 पृ क्र 165